दिनांक : २.५.२०१६

# खरेदी समिती सभा इतिवृत्त

खरेदी समितीची सभा सोमवार, दि. २ मे २०१६ रोजी दुपारी ४.३० वाजता मा. कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठ सभागृहात आयोजित करण्यात आली होती. सदरहू सभेस खालील खरेदी समिती सदस्य उपस्थित होते.

(०१) मा. कुलगुरू प्रा. डॉ. एम. एम. साळुंखे, अध्यक्ष, खरेदी समिती
(०२) मा. श्री. पंडित गवळी, वित्त अधिकारी व प्र. कुलसचिव, सदस्य, खरेदी समिती
(०३) मा. डॉ. जयदिप निकम, संचालक, आरोग्यविज्ञान विद्याशाखा, सदस्य, खरेदी समिती
(०४) मा. श्री. माधव पळशीकर, संचालक, संगणकविज्ञान विद्याशाखा, सदस्य, खरेदी समिती
(०५) मा. डॉ. संजीवनी महाले, संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, सदस्य, खरेदी समिती
(०६) मा. डॉ. अर्जून घाटुळे, परीक्षा नियंत्रक, परीक्षा कक्ष (आमंत्रित)
(०७) मा. श्री. अनिल थोरात, भांडार व्यवस्थापक, भांडार कक्ष (आमंत्रित)
(०८) मा. श्री. निखिल ताम्हनकर, प्र. खरेदी व्यवस्थापक, सचिव, खरेदी समिती

डॉ. प्रकाश अतकरे, कुलसचिव, डॉ. सूर्या गुंजाळ, संचालक, कृषिविज्ञान विद्याशाखा, मा. डॉ. मनोज किल्लेदार, संचालक, वास्तुकला, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, डॉ. आर.व्ही. वडनेरे, संचालक, निरंतरशिक्षण विद्याशाखा, डॉ. शरणकुमार लिंबाळे, संचालक, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा, डॉ. प्रकाश देशमुख, संचालक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा, श्रीमती चेतना कमळस्कर, सदस्या, खरेदी समिती हे बैठकीस उपस्थित राहू शकले नाहीत. सदरहू बैठकीत पुढील विषयांवर चर्चा करून निर्णय घेण्यात आले.

| विषय क्र. | तपशिल |
|---|---|
| **पीसी/२०१६-१७/०१** | **दि. २८.३.२०१६ रोजी झालेल्या खरेदी समितीच्या बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे व त्यावर मा. अध्यक्षांची सही घेणे.**<br>(टिपणी : दि. २८.३.२०१६ रोजी झालेल्या खरेदी समितीच्या बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे व त्यावर मा. अध्यक्षांची सही घेणे.)<br>**<u>ठराव क्र. पीसी/२०१६-१७/०१</u>**<br>**दि. २८ मार्च २०१६ रोजी झालेल्या खरेदी समितीच्या बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले व त्यावर मा. अध्यक्षांची सही घेण्यात आली.** |
| **पीसी/२०१६-१७/०२** | **दि. २८.३.२०१६ रोजी झालेल्या खरेदी समिती सभेतील निर्णयांवरील कार्यवाही.**<br>(टिपणी : **दि. २८.३.२०१६** रोजी झालेल्या खरेदी समिती सभेतील निर्णयांवरील कार्यवाहीची नोंद घेणे.)<br>**<u>ठराव क्र. पीसी/२०१६-१७/०२</u>**<br>**दि. २८.३.२०१६ रोजी झालेल्या खरेदी समिती सभेतील निर्णयांवरील कार्यवाहीच्या अहवालाची नोंद घेण्यात आली.** |

| विषय क्र. | तपशिल | |
|---|---|---|
| | विषय | कार्यवाही |
| | पीसी/२०१५-१६/५४<br>दि. २८.१.२०१६ रोजी झालेल्या खरेदी समितीच्या बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे व त्यावर मा. अध्यक्षांची सही घेणे. | कार्यवाही पूर्ण |
| | पीसी/२०१५-१६/५५<br>दि. २८.१.२०१६ रोजी झालेल्या खरेदी समिती सभेतील निर्णयांवरील कार्यवाही. | कार्यवाही पूर्ण |
| | पीसी/२०१५-१६/५६<br>संगणक केंद्रासाठीच्या Networking Managed Layer 2 Switches खरेदी करण्याबाबतचा प्रस्ताव.. | खरेदी समितीच्या ठरावाबाबतची पुढील कार्यवाही करण्याबाबत संगणक कक्षास कळवले. |
| | पीसी/२०१५-१६/५७<br>खरेदी आदेश क्र. २२९५ ला खरेदी समितीची कार्योत्तर मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव.. | कार्यवाही पूर्ण |
| | पीसी/२०१५-१६/५८<br>खरेदी आदेश क्र. २२९६ ला खरेदी समितीची कार्योत्तर मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव.. | कार्यवाही पूर्ण |
| | पीसी/२०१५-१६/५९<br>खरेदी आदेश क्र. २२९७ ला खरेदी समितीची कार्योत्तर मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव.. | कार्यवाही पुर्ण |
| | पीसी/२०१५-१६/६०<br>खरेदी आदेश क्र. २२९८, २२९९, २३०० व २३०१ ला खरेदी समितीची कार्योत्तर मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव.. | कार्यवाही पूर्ण |
| | पीसी/२०१५-१६/६१<br>खरेदी आदेश क्र. २३०२ ला खरेदी समितीची कार्योत्तर मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव.. | कार्यवाही पूर्ण |
| | पीसी/२०१५-१६/६२<br>खरेदी आदेश क्र. २३०३ ला खरेदी समितीची कार्योत्तर मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव.. | कार्यवाही पूर्ण |
| | पीसी/२०१५-१६/६३<br>परीक्षा कक्षासाठी Examination Management Systems खरेदी करण्याबाबतचा प्रस्ताव.. | खरेदी समितीच्या ठरावाबाबतची पुढील कार्यवाही करण्याबाबत परीक्षा कक्षास कळवले. |
| | पीसी/२०१५-१६/६४<br>ग्रंथनिर्मिती केंद्रासाठी Digital Multifunctional Copier Machine (Size A3) खरेदी करण्याबाबतचा प्रस्ताव.. | खरेदी आदेश क्र. २३०५ (रु. २३५५८५/-) निर्गमित करण्यात आला (पुरवठाकारः Shree Sales Corporation, Nashik) |

| विषय क्र. | तपशिल |
|---|---|
| पीसी/२०१६-१७/०३ | **परीक्षा कक्षासाठी परीक्षा साहित्य वाहतूकीसाठी** Logistics of Examination Material (Confidential) **वाहतूकदार निश्चित करण्याबाबतचा प्रस्ताव..**<br>(टिपणी : परीक्षा कक्षासाठी परीक्षा साहित्य वाहतूकीसाठी Logistics of Examination Material (Confidential) वाहतूकदार निश्चित करण्यासाठी ई-निविदा प्रसिद्ध करून वाहतूकदार निश्चित करण्यासाठीचा प्रस्ताव खरेदी कक्षास प्राप्त झाला होता. यासाठी परीक्षा विभागाच्या २०१६-१७ च्या अंदाजपत्रकात पुरेशी तरतूद उपलब्ध आहे. या वाहतूकदार निश्चितीसाठी परीक्षा विभागाने Tender No. e-Tender-Exam-4 dtd, 6 April 2016 for Logistics of Examination Material (Confidential) दि. ६.४.२०१६ रोजी वर्तमानपत्रात (दैनिक लोकमत) जाहिरात दिली होती. त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या ईटेंडर वेबपार्टलवर जाहिरात प्रसिद्ध करून दि. २२.४.२०१६ पावेतो ऑनलाईन निविदा मागवल्या होत्या, मात्र अंतिम दिनांकापर्यंत म्हणजेच दि. २३.४.२०१६, दु. २.०० पर्यंत एकच निविदा प्राप्त झाल्याचे दिसले, त्यामुळे या निविदेस दि. २६.४.२०१६ पावेतो मुदतवाढ देण्यात आली. या दिनांकापर्यंतही दोन निविदाच प्राप्त झाल्याचे ऑनलाईन निदर्शनास आले. त्यामुळे पुन्हा एकदा निविदेस दि. ३०.४.२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. या अंतिम दिनांकापर्यंत एकूण पुढीलप्रमाणे दोनच निविदाकारांनी आपापल्या निविदा ऑनलाईन सादर केलेल्या आहेत.<br>(१) स्कायरेल लॉजिस्टीक्स प्रा. लि., जळगाव, (२) एस.के. ट्रान्सलाईन्स प्रा. लि., जळगाव या दोन्ही निविदाकारांच्या तांत्रिक निविदा ऑनलाईन उघडण्यात आल्या व त्याची परीक्षा विभागाने तांत्रिक तपासणी केली असता यात सर्वच निविदाकार पात्र ठरल्याने या निविदाकारांच्या व्यापारी निविदा ऑनलाईन उघडून त्याचा तौलनिक तक्ता तयार करण्यात आला आहे.<br>व्यापारी निविदांनुसार पुढीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.<br>(१) स्कायरेल लॉजिस्टीक्स प्रा. लि., जळगाव : रु. ८०/- प्रती किलो (सर्व करांसह) (विद्यापीठातून परीक्षा केंद्रावर व परीक्षा केंद्रावरून विद्यापीठ मुख्यालय वाहतूक)<br>(२) एस.के. ट्रान्सलाईन्स प्रा. लि., जळगाव : रु. ६४/- प्रती किलो (सर्व करांसह) (विद्यापीठातून परीक्षा केंद्रावर व परीक्षा केंद्रावरून विद्यापीठ मुख्यालय वाहतूक)<br>यावर खरेदी समितीने न्युनतम दर देणारे मे. एस.के. ट्रान्सलाईन्स प्रा. लि., जळगाव यांच्याशी वाटाघाटी कराव्यात असे ठरले. त्यानुसार दूरध्वनीवरून मा. परीक्षा नियंत्रक, मा. वित्त अधिकारी, मा. अध्यक्ष यांनी वाटाघाटी केल्या असता पुरवठाकाराने अंतिम दर रु. ५९/- प्रती किलो (सर्व करांसह) असा दिला आहे, यावर उपस्थित सदस्यांनी चर्चा करून पुढीलप्रमाणे निर्णय एकमताने घेतला.<br><br>**<u>ठराव क्र. पीसी/२०१६-१७/०३</u>**<br>**परीक्षा कक्षास परीक्षा साहित्य वाहतुकीसाठी पुरवठादार नियुक्तीच्या प्रस्तावावर खरेदी समितीने सविस्तर चर्चा करून तसेच तौलनिक तक्त्यानुसार न्युनतम दर देणारे पुरवठादार मे. एस.के. ट्रान्सलाईन्स प्रा. लि., जळगाव यांच्याशी प्राप्त दर रु. ६४/- प्रती किलो (सर्व करांसह) यात निगोशिएशन्स करून सदर दर प्रती किलो रु. ५९/- प्रती किलो (सर्व करांसह) असा एकमताने निर्धारित करण्यात आला. त्यानुसार Logistics of** |

| विषय क्र. | तपशिल |
|---|---|
| | **Examination Material (Confidential) च्या सेवा मे. एस.के. ट्रान्सलाईन्स प्रा. लि., जळगाव यांच्याकडून रु. ५९/- (रुपये एकोणसाठ मात्र) प्रती किलो (सर्व करांसह) या दराने करार झाल्यापासून पुढील एक वर्षासाठी याच दराने घेण्यात यावी असे एकमताने ठरले. तसेच पुरवठादाराला कार्यादेश देणे व अनुषंगिक MOU करून घेणे व इतर आवश्यक ती कार्यवाही परीक्षा कक्षाने करावी असेही सर्वानुमते ठरले.** |
| **पीसी/२०१६-१७/०४** | **परीक्षा कक्षासाठी मे २०१६ च्या परीक्षा साहित्य वाहतूकीसाठी** HDPE Gunny Bags **खरेदी करण्याबाबतचा प्रस्ताव..**<br>(टिपणी : विद्यापीठाच्या परीक्षा कक्षास उत्तरपुस्तिका पोस्टाने/कुरियरने अथवा लॉजिस्टीक कंत्राटदारामार्फत पाठवण्यासाठी गनीबॅग (HDPE Gunny Bag with Polycoataing) ठरवलेल्या आकारानुसार खरेदीसाठी, परीक्षा कक्षाने निविदा सूचना दि. ६.४.२०१६ रोजी प्रसिध्द करून दि. २०.४.२०१६ पावेतो निविदा मागवल्या होत्या. या मुदतीत पुरेशा निविदा प्राप्त न झाल्याने परीक्षा कक्षामार्फत त्याची मुदत दि. २५.४.२०१६ पावेतो वाढवण्यात आली. यावेळी एकूण चार निविदाकारांकडून निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्या दि. २७.४.२०१६ रोजी तांत्रिक निविदा उघडल्या असता, यात चारपैकी तीन निविदाकारांनी पुरेशी कागदपत्र जोडली नसल्याचे आढळल्याने या निविदा बाद ठरल्या व त्यामुळे सर्वच निविदा रद्द करण्यात आल्या. सदरील खरेदी रु. ३ लाखाच्या आत असल्याने महाराष्ट्र शासनाच्या दि. ३०.१०.२०१५ (उद्योग व उर्जा विभाग) जीआरनुसार दरपत्रके मागवून खरेदी करता येईल, त्यानुसार परीक्षा कक्षाने यासाठी नव्याने दरपत्रके मागवली, ती समितीपुढे उघडण्यात आली. गणीबॅग पुरवण्यासाठी पुढील तीन पुरवठाकारांनी दरपत्रके सादर केलेली आहेत.<br>(१) राहूल एंटरप्रायजेस, नाशिक<br>(२) द जेंटलमन, नाशिक<br>(३) राहूल पॅकवेल इंडस्ट्रीज, नाशिक<br>तांत्रिक तपासणीनंतर व्यापारी देकार उघडण्यात येऊन त्याचे तुलनात्मक विवरण करण्यात आले. सदरचे तुलनात्मक विवरण व प्रस्ताव खरेदी समितीच्या विचारार्थ सादर.)<br>**<u>ठराव क्र. पीसी/२०१६-१७/०४</u>**<br>**परीक्षा कक्षासाठी परीक्षा साहित्य पाठवणे व परीक्षा केंद्रांवरून परीक्षा साहित्य मागवण्यासाठी गनी बॅग्जची खरेदी यासाठी कोटेशन मागवून न्युनतम दर देणारे मे. राहूल पॅकबेल इंडस्ट्रीज, नाशिक यांच्याकडून प्रती गणी बॅग रु. १०.५० (रु. दहा पैसे पन्नास) प्रमाणे एकावेळी रु. १ लक्षपर्यंत खरेदी करावयास समितीने एकमताने मान्यता दिली.**<br>**पुढील गरजेसाठी परीक्षा विभागाने मुंबई येथे ठोक पुरवठादार यांच्याकडे चौकशी करावी यासाठी पुढील समितीने मुंबई येथे जाऊन प्रत्यक्ष पाहणी करावी.**<br>**(१) डॉ. जयदिप निकम, संचालक, आरोग्यविज्ञान विद्याशाखा**<br>**(२) मा. परीक्षा नियंत्रक अथवा त्यांचे प्रतिनिधी**<br>**(३) मा. वित्त अधिकारी अथवा त्यांचे प्रतिनिधी**<br>**या समितीने पाहणी करून दरपत्रके घ्यावीत व त्यानुसार पुढील निर्णय मा. कुलगुरूंच्या मान्यतेने घ्यावा. असे एकमताने ठरले.** |

| विषय क्र. | तपशिल |
|---|---|
| पीसी/२०१६-१७/०५ | **ग्रंथनिर्मिती केंद्राने विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमाच्या पाठ्यपुस्तके मुद्रणाकरिता वेब ऑफसेट** (Tender No. PUR/2015-16/111) **व शिटफेड ऑफसेट** (Tender No. PUR/2015-16/112) **यांचे तांत्रिक निविदा उघडल्यानंतर तांत्रिक समितीच्या अहवालास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव..**<br>(टिपणी : विद्यापीठाने विविध शिक्षणक्रमांच्या मुद्रणाकरिता **वेब ऑफसेट मुद्रकांसाठी** Tender No. PUR/2015-16/111 प्रसिद्ध केली होती, त्यास प्रतिसाद देऊन चार मुद्रकांनी आपापल्या निविदा सादर केल्या होता. त्यांची तांत्रिक समितीने तपासणी केली असता ३ मुद्रकांचे प्रस्ताव योग्य तर एक मुद्रकाचेबाबत कागद तपासणी तांत्रिक अहवाल तपासणीस पाठवला मात्र जोडला नाही असे आढळले. त्यासाठी त्यांना देण्यात आली , तो त्यांनी सादर केला आहे व योग्य आहे.<br>विद्यापीठाने विविध शिक्षणक्रमांच्या मुद्रणाकरिता **शीटफेड ऑफसेट मुद्रकांसाठी** Tender No. PUR/2015-16/112 प्रसिद्ध केली होती, त्यास प्रतिसाद देऊन आठ मुद्रकांनी आपापल्या निविदा सादर केल्या होता. त्यांची तांत्रिक समितीने तपासणी केली असता ५ मुद्रकांचे सर्व पेपर्स योग्य होते तर ३ मुद्रकांचे मायनर त्रुटी होत्या, ज्या दुरुस्त करून घेतल्या जाऊ शकतात. त्या दुरुस्त करून घेण्यात आल्या व सर्व तांत्रिक निविदा पात्र ठरल्या.<br>याबाबत तांत्रिक समितीची बैठक दि. २५.४.२०१६ रोजी संपन्न झाली, या समितीच्या शिफारशी खरेदी समितीच्या विचारार्थ सादर.)<br>**<u>ठराव क्र. पीसी/२०१६-१७/०५</u>**<br>**विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांचे पुस्तके छपाईसाठीच्या वेब ऑफसेट** (Tender No. PUR/2015-16/111) **व शिटफेड ऑफसेट** (Tender No. PUR/2015-16/112) **तांत्रिक कागदपत्र उघडून तांत्रिक समितीने दि. २५.४.२०१६ च्या बैठकीत घेतलेल्या निर्णयांना एकमताने मंजूरी देण्यात आली.**<br>**त्यानंतर व्यापारी दर उघडून तौलनिक तक्ता (विवरण) तयार करावा आणि टेंडरमधील शर्तीनुसार पात्र पुरवठाधारकांचा तौलनिक तक्ता (विवरण) विद्यापीठ पोर्टलवर प्रसिद्ध करून तीन दिवसांत स्वतःच्या निविदेतील गुणांकनाबाबत हरकती मागवाव्यात, हरकती प्राप्त झाल्यास त्यांचे तांत्रिक समितीने निराकरण करावे व त्यानंतर आवश्यकतेनुसार प्रिंटरकडील सेवासुविधांची प्रत्यक्ष पाहणी करून पुढील बैठकीत सदरहू विषय ठेवावा असे सर्वानुमते ठरले.** |
| पीसी/२०१६-१७/०६ | **खरेदी आदेश क्र. २३०६ व २३०७ ला खरेदी समितीची कार्योत्तर मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव..**<br>(टिपणी : विद्यापीठाच्या विविध विभागांकडून प्राप्त झालेल्या खरेदी प्रस्तावानुसार खरेदी कक्षाने खालीलप्रमाणे खरेदी आदेश निर्गमित केलेले आहे. सदरहू खरेदी आदेशांतर्गतची खरेदी ही अत्यंत तातडीची असल्याने सदरचे खरेदी आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. प्राप्त झालेल्या मूळ प्रस्तावानुसार या खरेदीसाठी अंदाजपत्रकात पुरेशी तरतूद करण्यात आलेली असून निर्गमित केलेल्या खरेदी आदेशांस व खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळावी म्हणून प्रस्ताव खरेदी समितीच्या विचारार्थ सादर.) |

| विषय क्र. | तपशिल |
|---|---|
| | **खरेदी आदेश क्र.** **रक्कम** **पुरवठाकार/खरेदीचा तपशील**<br>२३०६ ९९७२०/- मे. हाय-टेक कमप्युटर सर्व्हिसेस (एन) प्रा. लि. नाशिक (iMAC Desktop)<br>२३०७ ९९१५९/- मे. मायक्रोनिक्स सिस्टम्स ॲंड सर्विसेस, नाशिक (RAM and Harddisk)<br>**<u>ठराव क्र. पीसी/२०१६-१७/०६</u>**<br>**सदरहू प्रस्तावास सर्वानुमते कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** |
| पीसी/२०१६-१७/०७ | **सेवासुविधा कक्षासाठी झायलो या वाहनासाठी ट्यूबलेस टायर्स खरेदी करण्याबाबतचा प्रस्ताव..**<br>(टिपणी : विद्यापीठाच्या सेवासुविधा कक्षास विद्यापीठ वाहन झायलो क्र. एमएच १५ सीएम २७२५ साठी ट्यूबलेस टायर्स खरेदीचा प्रस्ताव सक्षम प्राधीकरणाच्या मान्यतेसह प्राप्त झाला आहे. सदरच्या खरेदीसाठी अंदाजपत्रकात पुरेशी तरतूद करण्यात आलेली असून निधी शिल्लक आहे. त्यामुळे खरेदीचे प्रस्तावित आहे. या टयूबलेस टायर्सची दरपत्रके सेवासुविधा कक्षाकडूनच प्राप्त झाली होती. ती खरेदी समिती सभेच्या दिवशीच प्राप्त झाली. मा. वित्त अधिकारी यांचेपुढे सदरची दरपत्रके उघडण्यात आली. त्याचे तुलनात्मक विवरण करून ते व प्रस्ताव ऐनवळेचा विषय म्हणून समितीच्या विचारार्थ सादर.)<br>**<u>ठराव क्र. पीसी/२०१६-१७/०७</u>**<br>**विद्यापीठाच्या झायलो वाहनासाठी ट्यूबलेस टायर्स खरेदीस प्राप्त दरपत्रकातील न्युनतम दर देणारे पुरवठाकार मे. Formula 1 Zone, नाशिक यांच्याकडून रु. ७०३१/- प्रति ट्यूबलेस टायर्स या दराने पाच नग खरेदीस व त्यास अंदाजित खर्च रु. ३५१५५/- यास समितीने एकमताने मान्यता दिली व सदर पुरवठाधारकाकडून खरेदीचे आदेश निर्गमित करून ट्यूबलेस टायर्स खरेदी करावे असे सर्वानुमते ठरले.** |
| पीसी/२०१६-१७/०८ | **परीक्षा कक्षासाठी रेडिओ फ्रिक्वेंन्सी तंत्रज्ञानावर आधारित अल्टरनेट इंटरनेट कनेक्शन घेण्याच्या प्रस्तावाबाबत..**<br>(टिपणी : मा. परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग यांच्याकडून परीक्षा विभागाच्या प्रश्नपत्रिका ऑनलाईन डिलीव्हरीसाठी **SRPD** प्रणाली तसेच उत्तरपुस्तिकांचे ऑनलाईन इव्हॅल्युशन, इत्यादीसाठी सध्या परीक्षा विभागाकडे असलेल्या इंटरनेट व्यतिरिक्त रेडिओ फ्रिक्वेंन्सी तंत्रज्ञानावर आधारित अल्टरनेट इंटरनेट कनेक्शन आवश्यक असल्याने ती खरेदी करावी यासाठीचा प्रस्ताव ऐनवेळचा विषय म्हणून समितीपुढे सादर केला. यासाठी परीक्षा विभागाकडे **Conduct of Examination** या अर्थशीर्षाखाली पुरेशी आर्थिक तरतदू उपलब्ध असल्याचे सांगितले.<br>रेडिओ फ्रिक्वेंन्सी तंत्रज्ञानावर आधारित अल्टरनेट इंटरनेट कनेक्शन पुरवण्यास दोन कंपन्या उपलब्ध आहेत, त्या पुढीलप्रमाणे<br>(१) सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्कस ऑफ इंडिया **(STPI)**<br>(२) टाटा टेलीसर्व्हिसेस |

| विषय क्र. | तपशिल |
|---|---|
| | सदर दोन्ही कंपन्यांनी **feasibility** चेक करून घेतली व तसा अहवाल परीक्षा नियंत्रकांना सादर केला.<br>यापैकी **STPI** ची नाशिकमध्ये व्यवस्थित सेवा नाही असे दिसून आले, मात्र टाटा टेली सर्व्हिसेस यांचा गंगापूर मध्ये मोठा टॉवर आहे व त्यावरून रेडिओ फ्रिक्वेंन्सीने आपल्याला सुरुवातीला **2 MBPS** वेगाने सेवा उपलब्ध करून देऊ शकतात. यासाठी त्यांनी प्रथम **2 MBPS Wireless** कनेक्शन साठी रु. १.४५ लाख प्रती वर्ष **+** रु. १००००/- इनस्टॉलेशन खर्च असा दर दिला आहे. मात्र समितीने त्यांच्याशी निगोशिएशन्स केल्यानंतर अंतिम दर रु. १.३५ लाख प्रती वर्ष इन्स्टॉलेशनसह खर्चासह असा दर दिला व पुढे **4 MBPS** च्या अपग्रेडेशनसाठीसुध्दा इन्स्टॉलेशन खर्च घेणार नाही असे कळवले आहे. सदरहू प्रस्ताव ऐनवेळचा विषय म्हणून समितीच्या विचारार्थ सादर.)<br>**<u>ठराव क्र. पीसी/२०१६-१७/०८</u>**<br>**परीक्षा कक्षास रेडिओ फ्रिक्वेंन्सी तंत्रज्ञानावर आधारित अल्टरनेट इंटरनेट कनेक्शन मे. टाटा टेलिसर्विसेस यांच्याकडून 2 MBPS Wireless कनेक्शन रु. १.३५ लाख प्रती वर्ष इन्स्टॉलेशनसह खर्चासह या दराने एक वर्षासाठी घेण्यास समितीने सर्वानुमते मान्यता दिली. यासाठीचा आवश्यक प्रस्तावास वित्त विभागामार्फत मा. कुलगुरूंची मान्यता घ्यावी असे ठरले.** |
| **पीसी/२०१६-१७/०९** | **परीक्षा कक्षासाठी डिग्री प्रमाणपत्रांचे डिजीटलायझेशन (डिमॅटिंग) NSDL अथवा CDSC या डिपॉझिटरीजकडे करण्याच्या प्रस्तावाबाबत..**<br>(टिपणी : मा. परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग यांनी भारतातील बहुतांश विद्यापीठे ही त्यांच्याकडील पदवी प्रमाणपत्रे डिजीटल स्वरूपात यासाठीच्या डिपॉझिटरीजकडे सिक्युअर स्वरूपात स्टोअर (डिमॅटींग) करून ठेवतात, यामुळे विद्यार्थी व विद्यापीठ यांचा भविष्यात प्रमाणपत्र प्रमाणीकरणासाठी लागणारा वेळ व खर्च वाचतो, त्यामुळे आपल्या विद्यापीठाचेही पदवी, पदविका प्रमाणपत्र डिजीटलायझेशन करून घ्यावेत असा ऐनवेळचा विषय समितीच्या विचारार्थ सादर केला. याबाबत सभेपुढे माहिती ठेवतांना **CDSC (Central Depository)** ही संस्था रु. १०/- **per yerar per record** पद्धतीने सेवा उपलब्ध करून देते तर **NSDL (National Securities Depository)** ही संस्था मागील १९ वर्षांची सर्व प्रमाणपत्रे रु. १/- **per record + Taxes** या दराने तर पुढील प्रमाणपत्र रु. २/- प्रती रेकॉर्ड **+ Taxes** या दराने काम करवून देण्यास तयार असल्याचे कळवले, मात्र दरचर्चेनंतर **NSDL** हे पुढील रेकॉर्डही रु. १/- प्रति रेकॉर्ड **+ Taxes** (**per year** नाही) हे पुढील दिर्घ काळासाठी डिजीटलाईज्ड स्टोअरेज करून देणार असल्याचे सूचित केले. समिती सदस्यांनी यावर चर्चा करतांना या स्टोअरेजचा **Access** कसा? डिग्री प्रमाणपत्राची पद्धत काय? **Contract Termination Clause** काय? याबाबत माहीती विचारली, सदरहू प्रस्ताव समिती सदस्यांच्या विचारार्थ सादर.)<br>**<u>ठराव क्र. पीसी/२०१६-१७/०९</u>**<br>**विद्यापीठाचे पदवी, पदविका प्रमाणपत्र डिजीटलाईज स्वरूपात डिमॅटींग करण्यासाठी NSDL (National Securities Depository) यांनी दिलेला आर्थिक प्रस्तावाबाबत व तांत्रिक अटी-शर्तींबाबत विद्यापीठाचे कायदा सल्लागार (Legal Advisor) यांचे** |

| विषय क्र. | तपशिल |
|---|---|
| | **लेखी मत घेऊन त्यानुसार त्यासह हा विषय पुढील बैठकीत विचारार्थ ठेवावा असे सर्वानुमते ठरले.** |
| **पीसी/२०१६-१७/१०** | **परीक्षा कक्षाने [Examination Management System (End to End Soloution)] चे टेंडर दिले होते त्या प्रोसेसवरील प्राप्त पत्रव्यवहाराबाबतचा खुलासा नोंदवण्याच्या प्रस्तावाबाबत..**<br>(टिपणी : विद्यापीठाच्या परीक्षा कक्षाने **eTender No. Exam-3 dtd, 19 February 2016** अन्वये परीक्षा व्यवस्थापन प्रणाली **[Examination Management System (End to End Soloution)]** टेंडर जारी केले होते. ते २८ मार्च २०१६ रोजी तांत्रिक निविदा व वित्तीय निविदा उघडण्यात आल्या होत्या. यावर **Mindlogix Infratex Ltd,** तसेच माजी खासदार श्री. सुरेश वाघमारे यांनी पत्राद्वारे काही मुद्दे उपस्थित केले होते. त्यावर खरेदी समितीत मुद्देनिहाय चर्चा होऊन वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे विषद करण्यात आली.<br>(१) **Mindlogix Infratex Ltd.** याचे दि. २८.३.२०१६ चे पत्रात मुद्दा क्र. १ नुसार त्यांच्या कंपनीस **L1** असे इंडिकेट केले गेले आहे. तसा **Online Screen** चा प्रिंट आऊट सोबत जोडलेला आहे.<br>उत्तर : याबाबत चर्चा करतांना मा. परीक्षा नियंत्रक व समिती सदस्यांनी विषद केले की, व्यापारी निविदा ओपनिंगनंतर मुळात **L1** हे मॅग्नेटीक हि कंपनी होती, **Mindlogix Infratex Ltd** यांचे दर सर्वात अधिक होते. **(L3)**<br>मात्र **eTender** प्रणालीवर **L1** इंडीकेशन कसे आले याबाबत महाराष्ट्र शासनाच्या ईटेंडर पोर्टलचे स्थानिक प्रतिनिधी **Next Tenders** यांचेकडून स्पष्टीकरण ईमेलद्वारे मागवावे असे ठरले व भविष्यात असे प्रकार घडणार नाहीत याबाबत काळजी घेण्याचे त्यांना कळवावे असे ठरले.<br>(२) माजी खासदार श्री. सुरेश वाघमारे यांचे पत्रातील मुद्दानिहाय स्पष्टीकरण, समितीत चर्चा करण्यात आले ते पुढीलप्रमाणे :<br>मुद्दा (१) चे उत्तर : या टेंडरसाठी स्वतंत्र तांत्रिक समिती गठीत करण्यात आली होती , या समितीने प्रथम सर्व पुरवठाधारकांच्या तांत्रिक निविदा उघडून, त्यांची स्क्रुटीनी टेंडरमधील दिलेल्या मुद्यांनुसार (पान क्र. ४० ते ४२) नुसार पुर्ण करून त्याचे मार्कींग सिस्टीमनुसार तांत्रिक गुणतालिका तयार करण्यात आली. त्यानंतरच व्यापारी निविदा उघडून त्याचा तौलनिक तक्ता करून नंतर टेंडरमधील मार्कींग सिस्टीमनुसार त्याचीही गुणतालिका करण्यात आली व नंतर तांत्रिक निविदेचे गुण व व्यापारी निविदेचे गुण (७०:३०) या गुणोत्तरात गणन केले गेले (निविदा मूल्यमापन पद्धत - निविदा मुद्दा क्र. ५, पान नं. ४० ते ४२ यात दिलेल्या पद्धतीनुसार प्रोसेस केले गेले.) व त्यानंतर गुणानुक्रम काढण्यात येऊन निविदेतील मुद्दा क्र. ५.६, पान क्र. ४२ यानुसार यशस्वी निविदादार जाहीर करण्यात आला. ही सर्व प्रोसेस पारदर्शी पद्धतीने विद्यापीठाने पूर्ण केलेली आहे.<br>मुद्दा क्र. २ : यासंदर्भात टेक्निकल कमीटीने स्क्रुटीनी करून टेंडरमधील नियमानुसार निर्णय घेण्यात आला आहे. |

| विषय क्र. | तपशिल |
|---|---|
| | मुद्दा क्र. ३ : यासंदर्भात टेक्निकल कमीटीने स्क्रुटीनी करून टेंडरमधील नियमानुसार निर्णय घेण्यात आला आहे.<br>मुद्दा क्र. ४ : निविदेत भाग घेतलेल्या तीनही पुरवठादारांच्या कागदपत्रांची पडताळणी तांत्रिक बाबी संबंधातील समितीने छाननी करून त्यानंतरच निर्णय घेण्यात आलेला आहे.<br>मुद्दा क्र. ५ : मुद्दा क्र. १ मध्ये सविस्तर प्रक्रिया विषद करण्यात आली आहे. त्यानुसार निविदा अंतिम करण्याची प्रक्रिया पूर्ण केलेली आहे.<br>मुद्दा क्र. ६ : यासंदर्भात सर्व नियमांनुसार प्रक्रियांचे पालन करून विद्यापीठाने निविदा प्रक्रिया पूर्ण केलेली आहे.<br>**ठराव क्र. पीसी/२०१६-१७/१०**<br>**विद्यापीठाची परीक्षा व्यवस्थापन प्रणाली [Examination Management System (End to End Soloution)] eTender No. Exam-3 dtd, 19 February 2016 संबंधी प्राप्त आक्षेपांबाबत उपरोक्त मुद्देनिहाय चर्चा होऊन सर्व प्रोसेस योग्य रितीने पूर्ण केल्याची एकमताने नोंद घेण्यात आली तसेच या सिस्टीममुळे पुढे विद्यार्थ्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यानुसार संबधितांना याच तथ्यांवर आधारित उत्तर परीक्षा कक्षाने कळवावे असे सर्वानुमते ठरले.** |

(श्री. निखील ताम्हनकर)
प्र. खरेदी व्यवस्थापक
सचिव, खरेदी समिती

(श्री. अनिल थोरात)
भांडार व्यवस्थापक
भांडार कक्ष

(श्री. माधव पळशीकर)
संचालक, संगणकशास्त्र विद्याशाखा
सदस्य, खरेदी समिती

(डॉ. जयदिप निकम)
संचालक, आरोग्यविज्ञान विद्याशाखा
सदस्य, खरेदी समिती

(डॉ. संजीवनी महाले)
संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
सदस्य, खरेदी समिती

(डॉ. अर्जून घाटुळे)
परीक्षा नियंत्रक
परीक्षा कक्ष

(श्री. पंडित गवळी)
वित्त अधिकारी व प्र. कुलसचिव
सदस्य, खरेदी समिती

(प्रा. डॉ. एम. एम. साळुंखे)
कुलगुरु
अध्यक्ष, खरेदी समिती

ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

## खरेदी समिती सभा

दि.  २ मे २०१६, दुपारी ४.३० वाजता,

स्थळ : विद्यापीठ सभागृह

## इतिवृत्त